Thursday, March 05, 2009

**Mission Tobacco free youth**

Publication: Maharashtra Times, Edition: Mumbai, Supplement: Mumbai Times, Journalist: Bureau, Page No: 1 (sq.cms): 286

# मिशन टोबॅको फ्री यूथ

**तरुणांमधे तंबाखू खाण्याची क्रेझ वाढतेय, हे लक्षात घेऊन, युवा वर्गात जागृती करण्यासाठी मंच स्थापन करण्यात येईल.**

मुंबई टाइम्स टीम

आज देशातल्या १५ ते ४९ या वयोगटातल्या पुरुषांपैकी तब्बल ५७ टक्के पुरुष तंबाखू खातात. त्यापैकी ३३ टक्के तरुण सिगरेट ओढतात. तर २४ टक्के मुलांचा ओढा पानमसाला खाण्याकडे आहे. तंबाखूचं व्यसन लागणाऱ्यांमधे लहान मुलं आणि तरुण जास्त आहेत. या व्यसनाबद्दल जागृती करण्यासाठी ८ मार्चपासून होणाऱ्या 'वर्ल्ड कॉन्फरन्स ऑन टोबॅको ऑर हेल्थ'मधे खास युवकांसाठी मंच उभारण्यात येणार आहे. तंबाखूविरोधी जागृती करण्यासाठी युवा नेता तयार करणं हाच मंचाचा मुख्य हेतू असेल.

कुतूहल आणि धाडस हे युवा शक्तीचे मुख्य गुण. पण हेच गुण व्यसनाबाबत अवगुण ठरतात. सिगरेट, पानमसाला यांच्याबद्दल सुरुवातीला वाटणारं हे कुतूहल आणि ते खाण्याचं धाडस मग व्यसनात बदलतं. कित्येकदा मुलं पालकांचं अनुकरण करतात. 'वडील पानमसाला खातात, सिगरेट ओढतात, याचा अर्थ ते चांगलंच असणार, असं मुलांना वाटतं,' असं टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे असोसिएट प्रोफेसर डॉ. पंकज चतुर्वेदी म्हणतात. म्हणूनच आज ५७ टक्के पुरुषांना तंबाखूचं व्यसन आहे. चीन, अर्जेंटिना आणि भारतासारख्या विकसनशील देशात तंबाखू खाण्याचं प्रमाण सर्वात जास्त आहे.

तंबाखू खाण्यातला तरुणांचा इण्ट्रेस्ट लक्षात घेऊन, प्रत्येकाच्या आर्थिक कुवतीनुसार सिगरेट आणि पानमसाला बनवणाऱ्या कंपन्या आपला ब्रॅण्ड तयार करू लागल्यात. त्यामुळे कार्पोरेट सेक्टरमधे काम करणाऱ्या मुला-मुलींमधेही हे व्यसन वाढलंय. 'बीपीओ, कॉल सेण्टर, फिल्म, मीडिया अशा क्षेत्रातले तरुण थकवा घालवण्यासाठी या व्यसनांच्या आहारी जातात,' असं वर्ल्ड कॉन्फरन्सचे अध्यक्ष डॉ. पी.सी. गुप्ता यांना वाटतं. तंबाखूसंदर्भातलं वास्तव आणि त्यावरील उपाय यासंबंधी विचार करता यावा, यासाठी 'सलाम बॉम्बे फाऊण्डेशन', 'हीलिस सिखसिरीया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ' आणि 'ॲक्टइंडिया' या तीन संस्थांनी जागतिक परिषदेचं आयोजन केलंय. आठ ते अकरा मार्च या काळात मुंबईत एनसीपीएमधे ही १४ वी जागतिक परिषद होणार आहे. बाहेरच्या तरुणांनाही या परिषदेसाठी आमंत्रित करण्यात आलंय. 'तंबाखू आणि एण्टरटेन्मेण्ट इण्डस्ट्री', 'धूम्रपानाच्या पुनःवापरावर बंदी', 'महिला आणि तंबाखू नियंत्रण', 'तंबाखू आणि मीडिया' अशा विषयांवर चर्चा होईल. या परिषदेपूर्वी सहा आणि सात मार्चला 'ग्रॅण्ड हयात'मधे युवा मंचाची पूर्व परिषद होईल.



mumbaitimes@indiatimes.com